Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 21 December 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २१ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

********

- विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा समारोप–अधिवेशन यशस्वी झाल्याचा सरकारचा दावा
- मस्साजोग हत्या प्रकरणाच्या मुख्य सुत्रधारावर कारवाईची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही
- तूळजापूरचा पहिला राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार सामाजिक कार्यकर्त्या ममता सिंधुताई सपकाळ यांना जाहीर

आणि

- १९ वर्षाखालील महिलांच्या टी ट्वेंटी आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाची अंतिम फेरीत धडक

********

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचा आज समारोप झाला. आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या तीन मार्चपासून मुंबई इथं होणार होणार आहे. दरम्यान, नियोजित सर्व कामं पूर्ण झाल्यानं, हिवाळी अधिवेशन यशस्वी झाल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. ते पत्रकार परिषदेत बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. अधिवेशनाचा कालावधी कमी असला तरीही, ठरवलेलं कामकाज पूर्ण झाल्याचं, शिंदे यांनी नमूद केलं. ते म्हणाले –

***कमी कालावधी असला तरीसुद्धा सरकारने ठरवलेलं कामकाज वेगाने केलेलं कामकाज पूर्ण झालं. सतरा विधेयकं मंजूर झाली. या विधेयकांमध्ये अनेक महत्वाची विधेयकं जसं कारागृह सुधारणा,***

***प्राचीन स्मारके आणि इतरही महत्वाची विधेयकं देखील मंजूर झालेली आहेत. पुरवणी मागण्या मंजूर झाल्या पस्तीस हजार सातशे अठ्ठ्याऐंशी कोटींच्या. ज्या योजना आमच्या सरकारने जाहीर केल्या होत्या, लाडकी बहीण योजना असेल, अन्नपूर्णा योजना असेल, बळीराजाला सवलत असेल, इतरही काही योजना आहेत, ह्या सुरू ठेवण्यासाठी जी आर्थिक तरतूद लागते, ती तरतूद देखील पुरवणी मागण्यांमध्ये मंजूर केली.***

महाराष्ट्राला प्रगत, समृद्ध करण्यासाठी महायुती सरकार अहोरात्र काम करेल अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधान परिषदेत दिली. विधानपरिषदेत मांडण्यात आलेल्या नियम २५९ आणि २६० अन्वये झालेल्या चर्चेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. मराठवाडा आणि विदर्भातील औद्योगिक विकास आणि सिंचनावर भर देणार असल्याचं शिंदे यावेळी म्हणाले. मुंबई इथले इंदूमिलमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक ६ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करणार असल्याचंही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

राज्यात १२ जानेवारी पर्यंत सोयबीनची खरेदी सुरू ठेवणार असून गरज पडली तर यात वाढ करण्यात येईल, अशी ग्वाहीही उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. राज्यात कापूस खरेदी केंद्रातून आतापर्यंत ३८ लाख १० हजार क्विंटल कापसाची खरेदी झाली असल्याचे शिंदे यांनी यावेळी सांगितलं.

****

विरोधकांनी मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं. गेल्या दोन वर्षांत मराठवाड्यात सात प्रकल्प पूर्ण करून ३८ दशलक्ष घनमीटर पाणी साठा निर्माण केला. मराठवाड्यात ११ सिंचन प्रकल्पाला मान्यता दिली, कृष्णा मराठवाडा उपसा जलसिंचन योजनेलाही निधी पुरवल्याचं सांगताना, पश्चिम वाहिनी नद्यांचं पाणी गोदावरी खोऱ्यात वळवण्यासंदर्भात कामकाजाचा त्यांनी आढावा घेतला. मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाचा आराखडा नव्याने केंद्राकडे पाठवला असून, त्यासंदर्भात पाठपुरावा करून हा प्रकल्प पूर्ण करण्याची ग्वाही त्यांनी दिली. ते म्हणाले –

***संपूर्ण याचा आराखडा तयार करून केंद्र सरकारकडे आपण पाठवलेला आहे. आता केंद्र सरकारचं नवीन मिशन ज्यावेळेस त्या ठिकाणी तयार होईल, त्यावेळी पुन्हा एकदा आम्ही त्याचा पाठपुरावा करू. आणि आता जे काही आपण जलजीवन मिशनचे अंतर्गत नेटवर्क तयार केलं, त्याच नेटवर्कचा उपयोग करून त्याला जे काही जोड नेटवर्क तयार करायचा ग्रेडच्या रूपानं तयार करण्याकरता केंद्र सरकारची मदत घेऊन ही मराठवाडा ग्रीड आपल्याला कशी पूर्ण करता येईल याचा देखील प्रयत्न आपण करू.***

उद्योग क्षेत्राबद्दल बोलतांना, गेल्या अडीच वर्षात मराठवाड्यात ३४ मोठे प्रकल्प आले, ७२ हजार ८३९ कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन सुमारे दीड लाखांवर प्रत्यक्ष तसंच अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. टोयोटा किर्लोस्कर प्रकल्प कर्नाटकातून ऑरिक सिटीत आला, त्यामुळे १३ हजार लोकांना थेट रोजगार मिळाल्याचं सांगत, छत्रपती संभाजीनगर आणि जालना ही दोन शहरं महाराष्ट्रात उद्योजकांचा आकर्षण बिंदू ठरत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं. ते म्हणाले –

***महाराष्ट्राज् नेक्स्ट इंडस्ट्रियल मॅग्नेट इज छत्रपती संभाजीनगर अँड जालना. आज डीएमआयसीमध्ये आपण जो ऑरिक सिटी तयार केली, शेंद्रा बिडकीन या ज्या एमआयडीसी तयार केल्या, जागा शिल्लक उरली नाही इतकी मागणी आहे. कारण समृद्धी महामार्गामुळे थेट पोर्ट कनेक्टिव्हिटी त्याला मिळालेली आहे आणि जालन्याला आपण ड्रायफ्रूट देखील करतो आहोत. याच्यामुळे अशी इकोसिस्टीम त्या ठिकाणी तयार झाली आहे की त्यातनं मराठवाड्याच्या विकासाकरता एक मोठं दालन या ठिकाणी उभं राहीलं.***

लातूर इथल्या रेल्वे बोगी कारखान्यातून वंदे भारत रेल्वेच्या डब्यांची निर्मिती होणार असल्याकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधलं –

***मागच्या लक्षकाळात लातूरला कोर्स फॅक्टरी आपण तयार केली. वंदे भारत ट्रेन ही लातूरच्या कोच फॅक्टरीमध्ये तयार होणार आहे. त्याची घोषणा देखील आपल्या मंत्री महोदयांनी या ठिकाणी केलेली आहे.***

***आणि म्हणून मोठ्या प्रमाणात या ठिकाणी हे काम आपण करतो आहोत.***

✻✻✻✻

महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक दोन्ही सभागृहांच्या एकवीस सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठवण्यात आलं. चंद्रशेखर बावनकुळे हे या समितीचे अध्यक्ष असतील.

✻✻✻✻

मस्साजोग हत्या प्रकरणाच्या मुख्य सूत्रधाराला सोडलं जाणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. पवार यांनी आज मस्साजोग इथं मृत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. या प्रकरणात जे जे दोषी आढळून येतील त्यांना फाशीची शिक्षा दिली जाईल अशी ग्वाही पवार यांनी पीडित देशमुख कुटुंबीयांना दिली.

✻✻✻✻

दरम्यान, राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मस्साजोग गावात देशमुख कुटुंबियांची भेट घेत सांत्वन केलं. या हत्येमागे सूत्रधार कोण, हे मुळात जाऊन शोधणं गरजेचे आहे, असं मत पवार यांनी व्यक्त केलं. शरद पवार यांनी परभणी इथं डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून परिसराची पाहणी केली. या आंदोलनादरम्यान दगावलेले सोमनाथ सूर्यवंशी तसंच रिपब्लिकन सेनेचे नेते विजय वाकोडे यांच्या कुटुंबीयांची पवार यांनी भेट घेऊन, त्यांचं सांत्वन केलं.

✻✻✻✻

पहिला राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार समाजसेविका ममता सिंधुताई सपकाळ यांना जाहीर करण्यात आला आहे. तुळजापूर इथल्या हिरकणी पुरस्कार संयोजक समितीनं आज ही घोषणा केली. येत्या १२ जानेवारीला मान्यवरांच्या हस्ते तुळजापूर इथं हा पुरस्कार सपकाळ यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

✻✻✻✻

निवडणुकीदरम्यान नागरिकांच्या सहभागासाठी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीसाठी भारतीय माहिती सेवा अधिकारी संतोष अजमेरा यांना २०२४ चा आंतरराष्ट्रीय निवडणूक पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं आहे. डोमिनिकन रिपब्लिक इथं हा पुरस्कार सोहळा नुकताच पार पडला.

****

१९ वर्षाखालील महिलांच्या टी ट्वेंटी आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघानं अंतिम फेरीत धडक मारली आहे. काल झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात भारताने श्रीलंकेचा चार खेळाडू राखून पराभव केला. मलेशियात क्वालालांपूर इथं उद्या होणाऱ्या अंतिम सामन्यात भारताची बांगलादेश संघासोबत लढत होईल.

****

नांदेड जिल्ह्यातल्या बिलोली पंचायत समितीला आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. बिलोली पंचायत समिती आयएसओ मानांकन मिळवणारी जिल्ह्यातील पाचवी पंचायत समिती ठरली आहे. यापूर्वी नांदेड, लोहा, मुदखेड आणि देगलूर पंचायत समितीला आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या हस्ते समितीला आयएसओ मानांकन प्रमाणपत्र देण्यात आले.

****

परभणी इथल्या अप्रिय घटनेच्या निषेधार्थ आज आंबेडकरी संघटनांच्यावतीने पुकारण्यात आलेल्या जालना बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातल्या मुख्य बाजारपेठेतली बहुतांश दुकानं दिवसभर बंद राहिली. यानिमित्त शहरातून काढण्यात आलेल्या रॅलीत आमदार अर्जुन खोतकर यांच्यासह आंबेडकरी अनुयायांनी मोठ्या संख्येनं सहभाग घेतला. बंदमुळे शहरातल्या मुख्य चौकांमध्ये पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासंदर्भात केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ हिंगोली जिल्हा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीनं निदर्शन करण्यात आली. हिंगोली आणि कळमनुरी इथं डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या वतीने घोषणा देत शहा यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

****

छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेच्या वतीने आज ध्यान दिनाचं औचित्य साधून ध्यानधारणेविषयी जागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. योग अभ्यासक अनंत पंडित यांनी ध्यानसाधनेमुळे एकाग्रता वाढून तणाव कमी होतो असं सांगत, ध्यानाचं महत्त्व

विशद केलं. या वेळी उपस्थित विद्यार्थी-शिक्षक-पालक यांनी ध्यानधारणेची प्रात्यक्षिकं केली.

****

रोटरी इंटरनॅशलच्या वतीने छत्रपती संभाजीनगर शहरात महाएक्सपो प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. या प्रदर्शनात विविध स्टॉल्ससह देहदान चळवळीचं महत्त्व विशद करण्यासाठी स्वतंत्र स्टॉल रोटरीच्या वतीने उभारण्यात आला आहे. प्रदर्शनातून मिळणारी रक्कम जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या १५ हजार विद्यार्थींनीच्या आरोग्य तपासणी साठी तसंच ४० गावांमध्ये स्मशानभूमी उभारण्यासाठी उपयोगात आणली जाणार आहे.

****